# Nit Document

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

### साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा

**बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर व गादीच्या खोळी धुणे तसेच भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे या कामासाठीची ई-निविदा.**

**सन २०१९-२०**

**दि.०१/०८/२०१९ ते दि.३१/०७/२०२०**

**कालावधीकरीता**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

# साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा

**बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर व गादीच्या खोळी धुणे तसेच भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे या कामासाठीची ई-निविदा.**

**(एका वर्षा साठी)**

## ❖ अनुक्रमाणिका ❖


| अ.नं. | तपशील | पान नंबर |
|---|---|---|
| १ | निविदाधारकांची माहिती | २ ते २ |
| २ | निविदाधारकाने भरावयाची माहिती | ३ ते ३ |
| ३ | ई-निविदेच्या अटी शर्ती | ४ ते ९ |
| ४ | मार्गदर्शनपर इतर माहिती | १० ते १२ |

*** निविदा धारकाची माहिती ***

१) निविदा धारकाचे नांव :------------------------------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता :------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

कार्यालय फोन क्रमांक ------------------------------------------------------------------------------------------

निवास - ------------------------------------------------------------------------------------------

ऑफीस - ------------------------------------------------------------------------------------------

फॅक्स नंबर - ------------------------------------------------------------------------------------------

मोबाईल नंबर - ------------------------------------------------------------------------------------------

ई-मेल - ------------------------------------------------------------------------------------------

३) संपर्कासाठी प्रतिनिधीचे नांव ------------------------------------------------------------------------------------------

फोन क्रमांक ------------------------------------------------------------------------------------------

४) मालकाचे /भागीदारांची नांवे १) ------------------------------------------------------------------------------------------

२) ------------------------------------------------------------------------------------------

५) ठेकेदारीचा नोंदणी क्रमांक. :- ------------------------------------------------------------------------------------------

( शॉप ॲक्ट / कंपनी ॲक्ट प्रमाणे )

६) औद्योगिक रजिस्ट्रेशन नंबर :- ------------------------------------------------------------------------------------------

७) सध्याचे लेबर लायसन्स नंबर :- ------------------------------------------------------------------------------------------

८) PF प्रॉव्हीडंड फंड रजिस्ट्रेशन नंबर :- ------------------------------------------------------------------------------------------

९) GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा GST क्रमांक :- ------------------------------------------------------------------------------------------

१०) आयकर पॅन नंबर :- ------------------------------------------------------------------------------------------

११) (अ) बॅंक खाते नंबर :- ------------------------------------------------------------------------------------------

(ब) आय.एफ.एस.सी.कोड :- ------------------------------------------------------------------------------------------

१२) सन २०१७-१८ वार्षिक उलाढाल चार्टर्ड अकाउंन्टट सर्टिफिकेट :------------------------------------------------------

१३) (अ) बयाना रक्कम शासनाच्या वेबसाईड वर भरल्याची पावती:------------------------------------------------------

(ब) निविदा किंमत शासनाच्या वेबसाईड वर भरल्याची पावती:------------------------------------------------------

**निविदाधारकाची सही व शिक्का**

---

कार्यालयीन कामकाजा करीता

**◈ निविदाधारकाने भरावयाची माहिती ◈**

| अ.नं. | कागदपत्रांचा तपशील | जोडले असल्यास ✓ मार्क करावे |
|---|---|---|
| १ | ई-निविदा फी रु.३,३००/- रक्कम www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन जमा केलेची पावती. | |
| २ | बयाणा रक्कम रु.५५,०००/- मात्र रक्कम www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन जमा केलेची पावती. | |
| ३ | लॉन्ड्री कार्यान्वीत असलेबाबत ग्रामपंचायत/नगरपंचायत, नगरपालिका किंवा मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी यापैकी एक प्रमाणपत्र. किंवा महाराष्ट्र शासन जिल्हा उद्योग केंद्र यांचे प्रमाणपत्र. | |
| ४ | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र. | |
| ५ | GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र. | |
| ६ | पॅन कार्ड. | |
| ७ | लॉन्ड्री कामाचे सन २०१७-१८ वर्षामधील वार्षिक उलाढालीबाबत चार्टड अकाऊंटंट (CA) यांचे प्रमाणपत्र. | |
| ८ | Technical Document पा.नं.५ अ.नं.२, लॉण्ड्री संदर्भातील संस्थानने नमुद केलेली मशिनरी लॉण्ड्री निविदाधारकाकडे असले बाबत, सदरच्या पानावर फर्मचा शिक्का/सही देऊन ते पान स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावे. | |
| ९ | आपल्या फर्मचे नाव ब्लॅक लिस्टेड नसले/असलेबाबतचे हमीपत्र लेडरहेडवर सही शिक्यानिशी सादर करावे. | |

**निविदाधारकाची सही व शिक्का**

---

कार्यालयीन कामकाजा करीता

## ❖ई-निविदेच्या अटी शर्ती❖

१) लॉण्ड्री कामाची ई-निविदा ऑनलाईन सादर करावयाची आहे.

२) **अ)** ई-निविदा फी रक्कम रु.३,३००/- (अक्षरी रुपये - तीन हजार तीनशे मात्र) व बयाणा रक्कम (EMD) रु.५५,०००/- (अक्षरी रु. पंच्चावन हजार मात्र) रक्कम शासनाचे www.mahatendars.gov.in या वेबसाईटवर जमा करावी.

**ब) ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

**क)** ऑनलाईन ई-निविदा भरतेवेळी या Nit Document मधील पान नं.६ अ.नं.२६ वर नमुद केलेले कागदपत्रे स्कॅन करुन Upload करणे आवश्यक आहे.

३) Technical Bid व Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदाधारकांनी याबाबत साईआश्रम भकतनिवास व साई धर्मशाळाकडील कार्यालयात संपर्क करुन माहिती घ्यावी.

४) अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५) ई-निविदा फी व बयाणा रक्कम ऑनलाईन भरले शिवाय सादर केलेले बीड ऑफ कोटेशन (BOQ)चे कागदपत्र उघडले जाणार नाही.

६) ज्याची ई-निविदा मान्य होईल त्या निविदाधारकास या कामासाठी वार्षिक खर्चास मिळालेल्या मान्यता रक्कमेवर ५% रक्कम सुरक्षा अनामत म्हणून एक वर्षासाठी संस्थानकडे जमा केली पाहिजे. त्यामध्ये बयाणा रक्कम रु.५५,०००/- जमा करुन उर्वरीत रक्कम रोखीने जमा करावी लागेल. ई-निविदेत/कार्यादेशात नमुद केलेल्या कामा बद्दल कोणतीही तक्रार नसेल तर कामाचा कालावधी संपल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल. सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही किंवा निविदाधारकास मागणी करता येणार नाही.

७) निविदाधारकास प्री-बीड मिटिंगसाठी शिर्डी येथे उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्री-बीड मिटिंग वार- बुधवार दि. ०३ / ०७ /२०१९ रोजी सकाळी ११:०० वाजता ठेवण्यात आलेली आहे. प्री-बीड मिटिंगच्या तारखेत व वेळे मध्ये काही बदल झाल्यास आपणास दुरध्वनी किंवा पत्राव्दारे कळविले जाईल.

८) साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा करीता एकत्रित ई-निविदेमध्ये **१) बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर व गादीच्या खोळी धुणे (संस्थानचे कपडेसाठी दर)** तसेच **२)भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे** (भक्तांसाठीचे दर) असे दोन पध्दतीचे बीड ऑफ कोटेशन (BOQ) भरावयाचे आहे.

९) भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे या कामी निविदाधारकाने स्वतंत्र लॉण्ड्री कर्मचारी नेमूण सकाळी ८ ते १० व दुपारी ४ ते ६ या वेळेमध्ये प्रत्येक इमारतीमध्ये जाऊन भक्तांशी संपर्क करुन त्यांनी लॉण्ड्रीसाठीचे कपडे जमा करावे व भक्तांनी सकाळच्या सत्रातील दिलेले कपडे सायंकाळी परत करुन दुपारी दिलेले कपडे दुस-या दिवशी सकाळच्या वेळेत भक्तांना परत करणे या पध्दतीने सर्व्हिस द्यावी लागेल.

१०) भक्ताने कपडे दिल्यानंतर भक्ताला फर्मच्या नावाची मोबाईल नंबरसह पोहोच पावती देऊन, कपडे लॉण्ड्री करुन दिल्यानंतर त्याचे भक्ताला बील देऊन, त्या बीलाप्रमाणे भक्तांकडून परस्पर पैसे स्वीकारण्यात यावे.

११) संस्थानने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त रक्कम वसूल केली व तशी तक्रार साईभक्ताने केल्यास त्याबाबत निविदाधारकावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१२) भक्तांकडून त्यांच्या कपड्यांचे केलेल्या लॉण्ड्री कामाच्या शुल्कामध्ये संस्थानचा कुठलाही आर्थिक वाटा राहणार नाही. यासाठी ई-निविदाधारकाने याबाबतचे बीड ऑफ कोटेशन मध्ये योग्य दर भरावेत.

१३) साईआश्रम भक्तनिवास किंवा साईधर्मशाळा विभागाकडील भक्ताने कपड्यांबाबत काही तक्रार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लॉण्ड्री निविदाधारकाची राहील. यामध्ये भक्तांना काही नुकसान भरपाई द्यावयाची ठरल्यास संबंधीत लॉण्ड्री निविदाधारकाने ती आर्थिक नुकसान भरपाई रोख स्वरुपात भक्तांना त्वरीत देण्यात यावी. ते न दिल्यास सुरक्षा अनामत रक्कमेमधुन सदरची रक्कम वजा करुन भक्ताला दिली जाईल.

१४) ज्या निविदाधारकाला भक्तांचे कपडे धुणे/इस्त्री करणे या कामाचा कार्यादेश मिळेल, त्या निविदाधारकाला साईआश्रम भक्तनिवासमधील प्रशासकीय इमारतीसह १२ इमारतीमध्ये, तसेच साईधर्मशाळा विभागातील प्रशासकीय इमारतीसह ४ इमारतीमध्ये संस्थान ठरवून देईल त्या साईजमध्ये व जागेवर लॉण्ड्री कामाचे दर, मोबाईल नंबरसह बोर्ड लावणे क्रमप्राप्त राहील.

१५) कमी जास्त दराची कोणतीही ई-निविदा स्वीकारण्याचा, नाकारण्याचा, अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

१६) Technical व Nit Document चे प्रत्येक पानावर लॉण्ड्रीधारकाने फर्मचा शिक्का देऊन ते Document ऑनलाईन सादर करावेत.

१७) निविदाधारकाची लॉन्ड्री कामाचे क्षेत्रात सन २०१७-१८ या एका आर्थिक वर्षामध्ये रु.१० लाख पेक्षा जास्त उलाढाल असावी. तसे चार्टड अकाऊंटंट यांचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

१८) निविदाधारकाकडे अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह प्रशिक्षित कर्मचारी वर्ग आवश्यक आहे.

१९) कपडे धुण्यासाठी उच्च प्रतिचे केमिकल/डिटर्जेंन्ट (john son diverse, blueoxy, starving, rosary, alliance, तत्सम दर्जाचे) यांचा वापर निविदाधारकाने स्वखर्चाने करावयाचा आहे. कपडे धुलाई करणे कामी ISI ट्रेडमार्क असलेली वॉशिंग पावडर वापरावी.

२०) कार्यादेशाप्रमाणे काम करत असलेल्या कामाचे परीक्षण करण्याचा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांस पूर्ण अधिकार राहील.

२१) निविदाधारकाने ई-निविदा भरणे पुर्वी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळेमधील प्रत्यक्ष करावयाच्या कामाची पहाणी व सखोल अभ्यास करुन माहिती घेवून बीड ऑफ कोटेशन (BOQ) सादर करावे.

२२) बीड ऑफ कोटेशन (BOQ) सादर करतांना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास/राहिल्यास त्या ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील. अंतिम निर्णय हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी राखीव असेल.

२३) बीड ऑफ कोटेशन (BOQ) अपलोड करतांना निविदाधारकाने सर्व करासह रक्कम नमूद करावी. शासन नियमाप्रमाणे वेळोवेळी लागू होणा-या दरानुसार जी.एस.टी.ची रक्कम विहीत मुदतीत शासनाकडे भरणा करणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहिल. तसेच शासनाकडे जी.एस.टी. भरणा केलेबाबतची चलन प्रत व बील निहाय गोषवारा दरमहा बीलासोबत संस्थानकडे सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. जी.एस.टी ची रक्कम संस्थानकडे मागणीचा अधिकार निविदाधारकास राहणार नाही.

२४) दरमहा मागील महिन्यातील GST बाबतची पुर्तता केल्यानंतर तपशीलासह चालू महिन्याचे बील सादर करावे.

२५) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल.

२६) खालील तक्त्यात नमुद केलेले तांत्रिक कागदपत्रे (Technical Bid) स्कॅन करुन ते ऑनलाईन अपलोड करावेत.

| अ.नं. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई-निविदा फी रु.३,३००/- रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईड वर भरलेबाबत तपशील. |
| २ | बयाणा रक्कम रु.५५,०००/- मात्र रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईड वर भरलेबाबत तपशील. |
| ३ | लॉन्ड्री कार्यान्वीत असलेबाबत ग्रामपंचायत/नगरपंचायत, नगरपालिका किंवा मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी यापैकी एक प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र शासन जिल्हा उद्योग केंद्र यांचे प्रमाणपत्र. |
| ४ | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र. |
| ५ | GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र. |
| ६ | पॅन कार्ड. |
| ७ | लॉन्ड्री कामाचे सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षामधील वार्षिक उलाढालीबाबत चार्टड अकाऊंटंट (CA) यांचे प्रमाणपत्र. |
| ८ | Technical Document पा.नं.५ अ.नं.२, लॉण्ड्री संदर्भातील संस्थानने नमुद केलेली मशिनरी लॉण्ड्री निविदाधारकाकडे असले बाबत, सदरच्या पानावर फर्मचा शिक्का/सही देऊन ते पान स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावे. |
| ९ | आपल्या फर्मचे नाव ब्लॅक लिस्टेड नसले/असलेबाबतचे हमीपत्र लेडरहेडवर सही शिक्यानिशी सादर करावे. |

२७) इतर सर्व प्रकारचे कर शासनाला अदा करण्याची जबाबदारी निविदाधारक यांची राहील.

२८) ई-निविदेमध्ये नमुद केलेल्या कामामध्ये कपात करणे किंवा त्यामध्ये वाढ करणे तसेच आवश्यकतेनुसार एक किंवा एका पेक्षा जास्त पार्टीला कार्यादेश देऊ शकेल याचा अधिकार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना राहील.

२९) साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागामधील अधिक्षक यांनी काम प्रमाणीत करणे व त्यास मान्यता दिल्यानंतरच दरमहाचे लॉण्ड्री कामाच्या बीलाची रक्कम अदा करणेत येईल.

३०) निविदाधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल किंवा काम समाधानकारक करत नसेल, तर निविदाधारकास दिलेला कार्यादेश कुठलीही पुर्व सूचना न देता रद्द करुन संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

३१) संस्थानने नमुद केलेल्या मशिनरी व्यतिरीक्त इतर काही जादा मशिनरी आपणाकडे असल्यास Technical Document पा.नं.५ अ.नं.३ वर दिलेल्या तक्त्यात नमुद करुन ते पान स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावेत.

३२) कार्यादेश दिल्यानंतर ३० दिवसांचे आत करारनामा करुन देणेसाठी रु.६००/- चा गैरन्यायीक स्टॅम्प पेपर जमा करावा. परंतु, विहीत वेळेत करारनामा करुन न दिल्यास, अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास कार्यादेश रद्द करणेत येईल.

३३) ई-निविदेत नमुद केलेल्या कामासाठी निविदाधारक यांनी दुस-या लॉण्ड्रीधारकास काम दिल्याचे आढळल्यास निविदाधारकाचे लॉण्ड्रीचे काम रद्द करण्यात येईल.

३४) संबंधीत निविदाधारकाला काम जमत नसेल तर पर्यायी व्यवस्था म्हणून दुस-या लॉन्ड्री कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून सदरचे काम करुन घेतले जाईल, त्याचा खर्च संबंधीत कॅान्ट्रॅक्टरच्या बीलातून अथवा बयाणा रकमेतून वसूल करण्यात येईल.

३५) निविदाधारकाकडून संस्थानने ठरवून दिलेले कपडे तसेच भक्ताचे कपडे धुणेसाठी वापरत असलेले केमिकल साहीत्य तपासणीचा अधिकार संस्थानला राहील. केमिकल कमी दर्जाचे/कमी गुणवत्तेचे आढळल्यास कार्यादेश रद्द करणेत येईल.

३६) संस्थानचे किंवा भक्तांचे कपडे अस्वच्छ दिसून आल्यास किंवा व्यवस्थित इस्त्री केलेली नसल्यास निविदाधारकाला ते कपडे पुन्हा धुवून इस्त्री करुन द्यावे लागतील त्याचा अतिरिक्त मोबदला मिळणार नाही.

३७) कपडे धुवून/इस्त्री करुन दिल्यानंतर त्यामध्ये अस्वच्छ, डाग व खराब कपडे आढळून आल्यास पुन्हा विनाशुल्क कपडे धुवून घ्यावे लागेल. तरीही त्या महिन्यामध्ये १०० पेक्षा जास्त कपडे समाधानकारक धुतलेले नसतील तर संस्थानमार्फत रुपये.५००/-(अक्षरी रु.पाचशे मात्र) दंड आकारणेत येईल.

३८) काम समानधानकारक आढळून न आल्यास त्या महिन्याच्या कामाच्या एकूण बीलामधून ५ % पर्यंत दंडाची रक्कम कपात केली जाईल. कपात केलेली रक्कम निविदाधारकास मागणी करण्याचा अधिकार राहणार नाही.

३९) लॉण्ड्री निविदाधारकास लॉण्ड्री कामाचा कार्यादेश मिळाल्यानंतर त्यांना संस्थानच्या आस्थापनेवरील इतर निवासस्थानाकडील कपडे मंजूर दरातच धुवून/इस्त्री करुन घ्यावे लागतील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा वाढीव दर दिला जाणार नाही/ मागणी करता येणार नाही.

४०) कामाचा कालावधी फक्त एक वर्षाचा असल्याने कपडे लॉण्ड्री करण्यासाठी लागणारी मशिनरी यासाठी मोठी गुंतवणूक करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. कार्यादेशाचा कालावधी संपण्यापूर्वी पुढील कालावधी करीता ई-निविदा मागविणेत येईल.

४१) पुढील वर्षासाठी नविन ठेकेदाराला कार्यादेश पारीत होऊन नविन ठेकेदाराने काम सुरु करेपर्यंत, आहे त्याच मंजुर दरात काम करुन देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. दरात कोणत्याही प्रकारची वाढ दिली/मागणी करता येणार नाही.

४२) सदरची ई-निविदा कार्यादेश नसून फक्त बीड ऑफ कोटेशन (BOQ) मागविण्यासाठी आहे.

४३) कपडे धुणे/इस्त्री करणे कामी साईआश्रम भक्तनिवास मधील A ते L या १२ निवासी इमारतीमधून तसेच साईधर्मशाळा A, B, E, F या ४ इमारतीमधून स्वतःचे वाहनामध्ये कपडे घेऊन जाणे व पुन्हा वेळेवर पोहोच करणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

४४) करार कालावधीत कोणत्याही कारणांसाठी अथवा सबबीवर निविदाधारकास दरवाढ मागता येणार नाही/मिळणार नाही. निश्चित केलेल्या दरानेच संस्थानचे व भक्तांचे कपडे धुवून/इस्त्री करुन द्यावे लागतील.

४५) बीलाची रक्कम RTGS व्दारे निविदाधारकाचे बॅंक खाती जमा केली जाईल, त्यासाठी लागणा-या कागदत्रांची पुर्तता निविदाधारक यांना करावी लागेल.

४६) संस्थानचे किंवा भक्तांचे कपडे फाटल्यास/हारवल्यास त्याची नुकसान भरपाई निविदाधारक यांना द्यावी लागेल. ई-निविदेतील अटी शर्ती तसेच करारमान्यानुसार कुठल्याही प्रकारच्या अटी शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षित अनामत रकमेतून दंड वसूल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

४७) कपडे ने-आण करणा-या वाहनास अपघात व त्यातील कर्मचा-यास काही इजा झाल्यास किंवा इतर कारणास्तव दुखापत झाल्यास कामगार नुकसान भरपाई कायदा १९३३ नुसार भरपाई द्यावयाची झाल्यास ती जबाबदारी निविदाधारकाची राहील.

४८) उलटी केलेले अथवा इतर डाग पडलेले कपडे निविदाधारक यांनी प्रथम जंतूनाशक रसायनाचा वापर करुन धुवावेत व नंतर नेहमी प्रमाणे स्वच्छ धुवावेत.

४९) कपडे धुण्यासाठी स्वच्छ पाणी, सुकविणेसाठी जागा, मशिनरी, विज इ. उपलब्धतेची सर्व जबाबदारी निविदाधारकाची राहील. संस्थान या सुविधा उपलब्ध करुन देणार नाही.

५०) साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाचे परिसरात कपडे गोळा करण्यासाठी येणा-या वाहनावर फर्मचे नांव अथवा बोधचिन्ह असावे. तसेच ड्रायव्हर व काम करणा-या कर्मचा-यांची संपूर्ण माहिती स्वतः जवळ ठेवावी. सदर कर्मचा-यांस ओळखपत्र देऊन ते लावणे बंधनकारक असावे. बदली कर्मचारी बाबत पूर्व सूचना द्यावी.

५१) कपडे नेणे/आणणेकामी वापरावयाचे वाहनाचा खर्च व नियुक्त केलेल्या कामगारांचे जाणे-येण्याचा खर्च तसेच चहापाणी/जेवण/नाष्टा/राहाणेचा खर्च निविदाधारकाने स्वतः करावयाचा आहे.

५२) निविदाधारकाने/ त्यांचे कर्मचा-याने संस्थानचे परिसरात काम करताना संस्थानच्या कुठल्याही नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. जेणे करुन संस्थानचे परिसरात शांतता राहील, व संस्थानचे मालमत्तेचे नुकसान होणार नाही. तसेच साईभक्तांची सुरक्षितता आबाधित राहील याची काळजी घ्यावयाची आहे.

५३) ई-निविदेमधील अटी शर्तींचा व कागदपत्रांचा अभ्यास करुन ई-निविदा सादर करावी. ई-निविदेसंबंधी काही शंका असेल तर निविदाधारकांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे साईआश्रम भक्तनिवास कार्यालयात दुरध्वनी क्र.(०२४२३) २५९३०३ / २५९३०५ साईधर्मशाळा दुरध्वनी क्र.(०२४२३) २५९६०१/०५ वर संपर्क करावा.

५४) उपरोक्त शर्ती-अटी यापैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे व जादा अटी-शर्ती विहीत करणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापने राखून ठेवलेला आहे.

५५) संस्थानचे कपडे व भक्तांचे कपडे यामध्ये न्यूनतम दरधारक हे वेगवेगळे असल्यास त्याप्रमाणे दर स्विकृत करण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाकडे राहील.

५६) दैनंदिन लॉण्ड्रीसाठी साईआश्रम व साईधर्मशाळा विभागाकडुन देण्यात येणा-या कपड्यांचे संख्येसह कॅलेंडर खालील प्रमाणे असेल.

| दिनांक | कपड्याचा तपशील | एका दिवसाची संख्या | उदा. माहे मार्च २०१९ महिन्याची संख्या (३१ दिवस) | सूचना |
|---|---|---|---|---|
| १/३/१९ ते ३१/३/१९ | बेडशीट<br>उशी कव्हर<br>चादर<br>टॉवेल<br>गादीच्या खोळी | १,२६५<br>१,२४२<br>१००<br>१२५<br>५० | ३९,२१५<br>३८,५०२<br>३,१००<br>३,८७५<br>१,५५० | याप्रमाणे दररोज कपड्यांची संख्या धुणे/इस्त्री करणे कामी राहिल. भक्तांचे गर्दीनुसार संख्ये मध्ये फरक पडू शकतो. तसेच गादीच्या खोळी फक्त उत्सव कालावधीत टाकणेत येणा-या मंडपमधून निघेल त्याप्रमाणे राहील. |
| एका महिन्यासाठी एकूण कपड्यांची संख्या **८४,२४२** | | | | |

५७) या कामी कोणकोणत्या मशिनरी आपणाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे त्याचा तपशील Technical Document पान नं.५ अ.नं.२ वर दिलेला असून त्यानुसार मशिनिरी लॉण्ड्री निविदाधारकाकडे असणे आवश्यक आहे ती नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

५८) आपले फर्मचे नाव कोणत्याही संस्थेच्या काळ्या यादीत समाविष्ट नसलेबाबत आपले फर्मचे लेटरहेडवर (Self-Declaration) स्वतःचे स्वाक्षरीने हमीपत्र लिहून द्यावे.

५९) गादीच्या खोळी उत्सव कालावधीत टाकणेत येणा-या मंडपमधून निघेल त्याप्रमाणे राहील.

६०) संस्थानने नमुद केलेल्या मशिनरी लॉण्ड्री निविदाधारकाकडे उपलब्धतेबाबत परिक्षण करण्यासाठी संस्थान अधिकारी आपल्या प्रोजेक्टला वेळ पडल्यास समक्ष भेट देऊ शकतात.

६१) संस्थनला आवश्यकता वाटल्यास संबंधीत लॉण्ड्री निविदाधारकास मुळ कागदपत्रे तपासणीकामी बोलविण्यात येईल.

६२) कार्यादेशानुसार काम सुरु केलेनंतर कोणत्याही कारणास्तव काम बंद करता येणार नाही. मात्र काम बंद करावयाचे असल्यास संस्थानला किमान ०४ महिने अगोदर पुर्व सूचना देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. अशा परिस्थितीमध्ये निविदाधारकाची सुरक्षा अनामत रक्कम संस्थानकडून जप्त करण्यात येईल.

६३) सदर कामाचा कार्यादेश मिळाल्यानंतर संबंधीत लॉण्ड्री निविदाधारकास कायद्यानुसार लेबर लायसन्सची पुर्तता महिन्याच्या आत करुन देणे बंधनकारक राहिल. याबाबत विलंब केल्यास देय्य रक्कमेतून दरमहा रु.५००/- (अक्षरी रु.पाचशे रुपये) दंड वसूल करणेत येईल.

६४) न्याय प्रविष्ट बाब राहाता, कोपरगाव व औरंगाबाद न्यायालयाचे कक्षेत राहील.

६५) ई-निविदा भरणेपूर्वी "ज्या निविदाधारकांना कामाची माहिती घ्यावयाची असेल अशा निविदाधारकांनी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागामध्ये समक्ष जाऊन / कामाची पहाणी करुन व सखोल अभ्यास करुन माहिती घेवुन दर भरण्यात यावे. तसेच ई-निविदा ऑनलाईन भरणेकामी काही तांत्रिक अडचण असल्यास, श्री विनोद कोते मोबाईल नंबर ०७७२००७७२२१ क्रमांकावर संपर्क साधावा. इतर कागदपत्रा संबधी माहिती आवश्यक असल्यास श्री पी.के.कोते, प्र.अधिक्षक साईआश्रम भक्तनिवास कार्यालय दुरध्वनी क्रमाक-(०२४२३) २५९३०३/०५ मो.नं.०७७२००७७२७०, श्री के.एन.घायदार, प्र.अधिक्षक साईधर्मशाळा कार्यालय दुरध्वनी क्रमांक-(०२४२३) २५९६०१/०५ मो.नं.०७७२००७७२९४ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

## ❖ मार्गदर्शन पर इतर माहिती ❖

### कामाचा तपशील

ई-निविदा भरतांना खालील मार्गदर्शन पर मुद्यांचा विचार करुन बीड ऑफ कोटेशन (BOQ) ई-निविदा भरावी.

साईआश्रम भक्तनिवासमध्ये भक्तांचे निवासासाठी A ते L अशा एकूण १२ इमारती आहेत. त्यापैकी A,B व C या ३ इमारतीमध्ये ३८४ वातानुकूलीत खोल्या आहेत. तर D ते L या ९ इमारतींमध्ये ११५२ वातानुकूलीत यंत्रणा विरहित खोल्या आहेत. प्रत्येक इमारतीत ४ माळे असून एका माळ्यावर ३२ रुम आहेत. अशा सर्व इमारती मिळून एकूण १५३६ खोल्या या विभागात आहेत. इमारतीच्या प्रत्येक माळयावर दोन स्टोअर्स आहेत. असे १२ इमारतीमध्ये एकूण ९६ स्टोअर्स आहेत.

तसेच साईधर्मशाळा विभागात A ते F एकूण ६ इमारती असून २ इमारती साईबाबा संचलित कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आलेल्या आहेत व उर्वरित ४ इमारतीमध्ये प्रत्येक इमारतीत ४ माळे असून ३२ हॉल आहेत. असे एकूण १२८ हॉल आहे. इमारतीच्या प्रत्येक माळयावर दोन स्टोअर्स आहेत. असे ४ इमारतीमध्ये एकूण ३२ स्टोअर्स आहेत. प्रत्येक माळयावर हाऊसकिपींग कंपनीचा एक आऊटसोर्स मदतनीस २४ तास कार्यरत असतो. लॉण्ड्री कामासाठी याच कंपनीचे तीन लॉण्ड्री मदतनीस असतात. त्याबाबतचे पर्यवेक्षकीय कामकाजासाठी संस्थानचा एक स्थायी मदतनीस असतो.

साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळे मधील बेडशीट, उशी कव्हर, चादर, टॉवेल व गादीच्या खोळी धुणे/इस्त्री करणे करीता नेण्यासाठी आपणास दररोज सकाळी ०७:०० वाजता आपल्या स्वत:चे वाहनासह विभागात हजर रहावे लागेल. हॉल व खोलीमध्ये भक्तांनी वापरलेले कपडे धुणे/इस्त्री करणे कामासाठी देणे करीता लॉण्ड्री मदतनीस यांनी प्रत्येक इमारतीचे ४ माळयांवरील सर्व कपडे इमारतीच्या तळ माळयावर मोजून गोळा करुन ठेवलेले असतात. ते आपण स्वत: पुन्हा मोजदाद करुन ताब्यात घ्यावयाचे आहे. याप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागातील १२ इमारतींचे व साई धर्मशाळा विभागातील ४ इमारतीतील कपडे मोजून ताब्यात घेतल्यानंतर संस्थानचे स्थायी मदतनीस संस्थानच्या डी.पी. पुस्तकावर इमारत निहाय सदरच्या कपड्यांच्या नोंदी करतील. कपडे धुणे/इस्त्री करणे देण्यात येत आहेत, याची माहिती म्हणून त्यावर आऊटसोर्सिंग कंपनीचे जनरल मॅनेजर तसेच संस्थानचे शिफ्ट पर्यवेक्षक यांच्या स्वाक्षरी असतील. डी.पी. पुस्तकावरील केलेल्या नोंदी बरोबर असून त्याप्रमाणे कपडे धुणेसाठी ताब्यात मिळाले आहेत, यासाठी निविदाधारक यांना डी.पी. पुस्तकावर स्वाक्षरी करावी लागेल. त्याची एक प्रत निविदाधारक यांना दिली जाईल.

वरील प्रमाणेच अगोरदच्या दिवशी धुणे/इस्त्री करणे करीता नेलेले कपडे दुस-या दिवशी धुऊन परत करावयाचे आहे. धुऊन आणलेले कपडे निविदाधारक यांनी स्वत:च्या वाहनाने प्रत्येक इमारतीच्या तळ माळयावर लॉण्ड्री मदतनीस यांचे ताब्यात मोजून द्यावयाची आहे. परंतू धुऊन आलेले कपडे स्वच्छ धुतलेले किंवा व्यवस्थीत इस्त्री केलेले नसले तर ते पुन्हा विनामुल्य धुणेसाठी किंवा इस्त्री करणेसाठी परत केले जातील. त्याबाबतच्या नोंदी लॉण्ड्री मदतनीस ठेवतील. एकूण धुवून इस्त्री करुन आलेले कपडे इमारतीमध्ये पोहोच केल्यानंतर, दिलेल्या कपड्यांची पोहोच पावती कॉन्ट्रॅक्टर यांनी संस्थानचे स्थायी मदतनीस यांना कपडे धुऊन/इस्त्री करुन बरोबर मिळाले आहेत. याबाबत स्वाक्षरी घेऊन पोहोच पावती संस्थानचे मदतनीस यांना द्यावयाची आहे.

अशा धुऊन दिलेल्या कपड्यांच्या तपशीलाप्रमाणे महिन्याचे अखेरीस निविदाधारक यांनी बील सादर करावयाचे आहे. सदरचे बीलाची रक्कम ही धुऊन दिलेल्या पोहोच पावत्यांच्या नोंदी प्रमाणे असल्यास, बील सादर केले नंतर १५ दिवसांचे अंतराने बील अदा करण्यात येईल.

### ❖ भक्तांचे कपडे भक्तांकडून शुल्क घेऊन लॉण्ड्री करुण देणे

साईआश्रम व साईधर्मशाळा विभागातील निवासी भक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे या कामी निविदाधारकाने स्वतंत्र लॉण्ड्री कर्मचारी नेमूण सकाळी ८ ते १० व दुपारी ४ ते ६ या वेळेमध्ये प्रत्येक इमारतीमध्ये जाऊन भक्तांशी संपर्क करुन त्यांनी लॉण्ड्रीसाठीचे कपडे गोळा करावे व भक्तांनी सकाळच्या सत्रातील दिलेले कपडे सायंकाळी देऊन दुपारी दिलेले कपडे दुस-या दिवशी सकाळच्या वेळेत भक्तांना परत करणे या पध्दतीने सर्व्हिस द्यावावयाची आहे.

भक्ताने कपडे दिल्यानंतर भक्ताला फर्मच्या नावाची मोबाईल नंबरसह पोहोच पावती देऊन, कपडे लॉण्ड्री करुन दिल्यानंतर त्याचे भक्ताला बील देऊन त्या बीलाप्रमाणे भक्तांकडून परस्पर पैसे स्वीकारण्यात यावे. या मध्ये संस्थानचा कुठलाही प्रकारचा आर्थिक व्यवहार राहणार नाही.

### ❖ प्रशिक्षण आणि शिक्षण

साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागामधील संस्थानचे बेडशीट, उशी कव्हर, चादर, टॉवेल व गादीच्या खोळी धुणे/इस्त्री करणे व भक्तांचे कपडे धुणे/इस्त्री करणे कामासाठी वापरण्यात येणारा कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असावा. कपड्यांचा दर्जा व स्वच्छता राखण्यासाठी तसेच चांगली सेवा मिळावी या करीता कर्मचा-यांना त्यांचे कामानुसार प्रशिक्षण देणे गरजेचे आहे त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

### ❖ जबाबदारी

**कॉन्ट्रॅक्टरची**

१) साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळेमधील बेडशीट, उशी कव्हर, चादर, टॉवेल व गादीच्या खोळी धुणे/इस्त्री करणे कामाचे संस्थानचे सोईप्रमाणे दररोजचे वेळापत्रक तयार करण्यात यावे व त्याप्रमाणे काम करावे.
२) योग्य उपकरणे आणि साहीत्याचा वापर करावा.
३) साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळेचे परिसरात लॉन्ड्री कामासाठी वापरण्यात येणारे वाहनावर आपल्या लॉन्ड्रीचे नांव किंवा बोधचिन्ह असावे.
४) संस्थान वरिष्ठांनी दिलेल्या प्रासंगिक सूचनांना तात्काळ प्रतिसाद देणेत यावा.
५) संस्थान कर्मचारी व भक्तांबरोबर सभ्य व मैत्रीपूर्व वागणूक असावी.
६) साईभक्तांनी दिलेले कपडे त्यांना धूवून वेळेत परत करावेत त्याबद्दल तक्रार येऊ देवू नये.
७) कायद्यातील तरतुदीप्रमाणे कर्मचा-यांचा पगार देण्याची जबाबदारी निविदाधारक यांची राहील.
८) संस्थानला आवश्यकता वाटल्यास काम करीत असलेल्या निविदाधारकाला ३ महिने किंवा नविन निविदाधारकाची नेमणुक होई पावेतो मुदतवाढ दिल्यास, मागील आहे त्याच मंजूर दराने काम करण्याची जबाबदारी निविदाधारक यांची राहील.
९) ज्या निविदाधारकाला भक्तांचे कपडे धुणे/इस्त्री करणे या कामाचा कार्यादेश मिळेल, त्या निविदाधारकाला प्रशासकीय इमारतीसह भक्तनिवास इमारतीमध्ये, संस्थान ठरवून देईल त्या साईजमध्ये व जागेवर लॉण्ड्री कामाचे दर, मोबाईल नंबरसह बोर्ड लावणे क्रमप्राप्त राहील.

❖ **संस्थान मार्फत मुल्यमापन**

निविदाधारक पुरवित असलेल्या सेवा व कामाचे दर महिन्याला मूल्यमापन करण्यात येईल. निविदाधारकाकडून बेडशीट, उशी कव्हर, चादर, टॉवेल, गादीच्या खोळी धुणेसाठी वापरात असलेले साहीत्य तपासणीचा अधिकार संस्थानला राहील. केमिकल कमी दर्जाचे/कमी गुणवत्तेचे आढळल्यास कार्यादेश रद्द करण्यात येईल.

❖ **साईआश्रम भक्तनिवासमधील स्टोअर व दररोज धुण्यासाठी असलेल्या कपड्यांची संख्या**

| अ.नं. | इमारतीचा तपशील | एकूण इमारत संख्या | प्रत्येक इमारतीमधील स्टोअर संख्या | एकूण स्टोअरची संख्या | लॉण्ड्री कामासाठी एका दिवसाची कपड्यांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | A,B,C, (AC) | ३ | ८ | २४ | १) बेडशीट- १६०० <br> २) उशीकव्हार- १५०० <br> ३) टॉवेल- २०० <br> ४) सोलापूर चादर- १०० <br> ५) चादर-२५० |
| २ | D,E,F,G,H,I,J,K,L (NAC) | ९ | ८ | ७२ | |
| | एकूण | १२ | --- | ९६ | |

❖ **साई धर्मशाळेमधील स्टोअर व दररोज धुण्यासाठी असलेल्या कपड्यांची संख्या**

| अ.नं. | इमारतीचा तपशील | एकूण इमारत संख्या | प्रत्येक इमारतीमधील स्टोअर संख्या | एकूण स्टोअरची संख्या | लॉण्ड्री कामासाठी एका दिवसाची कपड्यांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | A, B, E, F, | ४ | ८ | ३२ | १) बेडशीट- ६०० <br> २) उशीकव्हार- ५०० <br> ३) टॉवेल- नाही <br> ४) सोलापूर चादर- ३० <br> ५) चादर -१०० <br> ६) गादी खोळी – उत्सव व नंतर जेवढे असेल. |
| | एकूण | ४ | ८ | ३२ | |

निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का